वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)

२) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.

३) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर यांचे दि.१०/०८/२०१६ रोजीचे पत्र.

४) मा. लेखाधिकारी यांचेकडील दि.१०/०८/२०१६ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.

५) दि.१२/०८/२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/१२२८/१६
दि. १२/०८/२०१६

विषय – नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.

श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका (संगणक क्रं.५८५१)

आदेश,

श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षिका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.०७/०२/१९९१ रोजी रूजू झालेल्या आहेत. श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका, यांची जन्मदिनांक २३/०८/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक २२/०८/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका,यांना दि.३१/०८/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका ह्या दिनांक ३१/०८/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका,यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम यांचेकडील कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.४ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचे कडील दि.२९/०४/२०१६रोजीचा थकबाकी नसले बाबतचा दाखला.



Scanned with CamScanner

श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका, यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.
त्या दि.०७/०२/१९९१ पासुन मनपाच्या सेवेत सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत.

सबब, मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदीनुसार या आदेशान्वये श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका, यांना दिनांक ३१/०८/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

१८।४।१६

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्रीम. जोगदंडे रत्नमाला चंद्रकांत, सहाय्यक शिक्षिका,
माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर

२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner